दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १३१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.४ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# खा.सुनील तटकरे यांनी घेतली केंद्रीय गृहमंत्री ना.अमित शहा यांची भेट

## अल्पव्याजदरात दीर्घमुदतीची कर्ज आणि एनडीआरएफ बेस कॅम्पची मागणी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

**रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी मंगळवार, दि. ३ ऑगस्ट २०२१ रोजी देशाचे गृहमंत्री तसेच सहकारमंत्री ना.अमित शहा यांची भेट घेऊन लोकसभा मतदार संघातील रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील लघुउद्योजक, दुकानदार, उद्योगपती, छोटे व्यावसायिक तसेच अन्य रोजगार यांना कमीव्याज दरामध्ये दीर्घमुदतीचे कर्जवाटप करण्यासोबतच तातडीने एनडीआरएफ बेस कॅम्पची मागणी उभारण्याच्या मागणीची दोन वेगवेगळी निवेदने दिली आहेत.**



कोकणातील राष्ट्रीयकृत तसेच सहकारी बँकांनी अर्थव्यवस्थेचे गाडे व्यवस्थित पूर्वपदावर आणण्यासाठी खा.तटकरे यांनी या निवेदनामध्ये सात विविध सुचना करून या सुचनांवर केंद्रसरकारने कार्यवाही केल्यास सर्व बाधित उद्योग व व्यापारउदीम यांना चालना मिळण्याचा दावा केंद्रीय सहकारमंत्री ना.अमित शहा यांच्याकडे केला आहे.

केंद्रीय गृहमंत्री ना.अमित शहा यांना दिलेल्या निवेदनानुसार खा.सुनील तटकरे यांनी, रायगड रत्नागिरी या लोकसभा मतदार संघामध्ये अतिवृष्टी, रेल्वे दूर्घटना, इमारत दूर्घटना, भूस्खलन तसेच औद्योगिक अपघात अशा विविध कारणांनी सातत्याने जिवितहानी तसेच वित्तहानी होत असून अनेकांना अपंगत्व येऊनही हजारो संसार उदध्वस्त झाल्याकडे लक्ष वेधले आहे.

रायगड व रत्नागिरी नद्यांच्या महाप्रलयांमुळे नद्यांच्या परिसरात होणारे जिवितांचे नुकसान याबाबत खा.तटकरे यांनी एनडीआरएफ बेस कॅम्पची गरज विशेष महत्व अधोरेखित करून तातडीने पूर्ततेची मागणी केली आहे.

# पूरग्रस्तांसाठी ११ हजार ५०० कोटींची मदत जाहीर; ठाकरे मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळाचा महत्वपूर्ण निर्णय



**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या आठवड्यात कोकणात, पश्चिम महाराष्ट्रात आलेल्या महापुरामुळे अनेक संसार उद्ध्वस्त झाले. या पुरात लोकांची उभी पिकं नष्ट झाली, घरं कोसळली, संसार उघड्यावर आले. मागील काही दिवसांपासून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेदेखील पूरग्रस्त भागाचा दौरा करत होते. यात नुकसानीचा आढावा घेऊन पूरग्रस्तांना मदत केली जाईल असं सांगितलं जात होतं. अखेर राज्य सरकारनं आजच्या मंत्रिमंडळात ही मदत जाहीर केली आहे.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी तातडीची मदत तसेच दुरुस्ती व इतर दीर्घकालीन उपायांसाठी ११ हजार ५०० कोटी रुपये खर्चास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत मदत व पुनर्वसन विभागाने नुकसानी बाबत सादरीकरण केले. त्यानंतर मंत्रिमंडळात यास मान्यता देण्यात आली आहे.

सानुग्रह अनुदान:- कुटुबांना कपडे तसेच घरगुती भांडी/वस्तु यांचे नुकसानीकरिता ४८ तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडले असण्याची अट शिथिल कन ५०००/- रुपये प्रतिकुटुंब , कपडयांचे नुकसानीकरिता आणि ५०००/- रुपये प्रतिकुटुंब, घरगुती भांडी/वस्तु यांच्या नुकसानीकरिता देण्यात येईल.

पशुधन नुकसान-दुधाळ जनावरे -४०,०००/- रुपये प्रति जनावर, ओढकाम करणारी जनावरे-३०,०००/- प्रति जनावर, ओढकाम करणारी लहान जनावरे - २०,०००/- प्रति जनावर, मेंढी/बकरी/डुकर - ४०००/- (कमाल ३ दुधाळ जनावरे किंवा कमाल ३ ओढकाम करणारी जनावरे किंवा कमाल ६ लहान ओढकाम करणारे जनावरे किंवा कमाल ३० लहान दुधाळ जनावरे प्रति कुटुंब या मर्यादेत). कुक्कुटपालन पक्षी- रु ५०/- प्रति पक्षी, अधिकतम रु ५०००/- रुपये प्रति कुटुंब

घरांच्या पडझडीसाठी मदत :- पूर्णत: नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी १,५०,०००/- रुपये प्रति घर. अंशत: पडझड झालेल्या (किमान ५०%) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत ५०,०००/- प्रति घर . अंशत: पडझड झालेल्या (किमान २५ %) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत २५,०००/- प्रति घर . अंशत: पडझड झालेल्या (किमान १५ %) कच्च्या/ पक्क्या घरांसाठी रु १५,०००/- प्रति घर. नष्ट झालेल्या झोपडया रु १५,०००/- प्रति झोपडी. (शहरी भागात मात्र ही मदत घोषित केलेल्या झोपडपट्टी पट्टयातील पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपडयासाठी देय राहील. गामीण भागात अतिक्रमित झोपडी जे नियमितीकरणास पात्र आहेत पण अद्याप नियमितीकरण झालेली नाहीत ती पात्र राहतील).

मत्य बोटी व जाळयांसाठी अर्थसहाय्य :- अंशत: बोटीचे नुकसान - १०,०००/- रुपये, बोटींचे पुर्णत : नुकसान - २५,०००/-. जाळयांचे अंशत: नुकसान- ५०००/, जाळयांचे पुर्णत: नुकसान- ५०००/- रुपये. हस्तकला/कारागीरांना .../२

# संक्षिप्त...

## परमबीर सिंग प्रकरणाला वेगळं वळण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केलेल्या १०० कोटी वसुली टार्गेटच्या आरोपामुळे देशमुखामागे ईडीचा ससेमिरा लागला असला तरी हे आरोप करणारे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग चांगलेच अडकले आहेत. मुंबई आणि ठाण्याचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्यासह ५ पोलीस अधिकाऱ्यांवर सुरु असलेल्या खंडणी प्रकरणात आता दाऊदचा हस्तक छोटा शकीलचा सहभाग आढळून आला आहे. त्यामुळे या प्रकरणात एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणातील तक्रारदार श्यामसुंदर अग्रवाल याच्या म्हणण्यानुसार त्याला एका खोट्या प्रकरणात अडकवण्यात आलं आणि त्याच्यावर मोक्का लावण्यात आला. त्याला आणि त्याच्या कुटुंबियांना धमकावून वसुली करण्यात आली, असा आरोप श्यामसुंदर अग्रवालनं केला आहे.

ठाणे येथील एका बांधकाम व्यावसायिकाच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. यात सिंग यांच्यासह डीसीपी अकबर पठाण, पोलीस अधिकारी श्रीकांत शिंदे, पीआय आशा कोरके, नंदकुमार गोपाळे, संजय पाटील, खासगी इसम सुनील जैन, आणि संजय पुनमिया यांच्याविरोधात विरोधात मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे भादंवि कलम ३८७, ३८८, ३८९, ४०३, ४०९, ४२०, ४२३, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ल), १६६, १६७, १७७, १८१, १८२, १९३, १९५, २०३, २११, २०९, २१०, ३४७, १०९, ११०, १११, ११३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यात जैन आणि पुनामिया यांना अटक करण्यात आली आहे. आता या प्रकरणात मोक्का देखील लावण्यात आला आहे. जैन आणि पुनामिया यांच्याकडून २६० जीबी डेटा पोलिसांनी हस्तगत केला आहे. त्यातून खूप मोठे धक्कादायक खुलासे होण्यास सुरुवात झाली आहे.

## 'पुष्पगुच्छ, जाहिरात, बॅनर याऐवजी पूरग्रस्तांना मदत करा'



कोकणातील चिपळूण, महाड तसेच पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांत महापुराने हाहाकार माजवला आहे. पुराच्या पाण्याने कित्येकांची घर-दारे व दुकाने वाहून गेली आहेत. चहूबाजूंनी लोक शक्य तेवढी मदत करत आहेत. अन्नधान्य, औषधे, दैनंदिन जगण्यासाठी लागणाऱ्या बाबी, कपडे या विशिष्ट मदतीसह आर्थिक मदतही लागणार आहे. भाजपतर्फे पूरग्रस्तांना मदत करण्याचे काम अव्याहत सुरूच आहे. भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी पूरग्रस्त भागात जाऊन मदत करीतच आहेत. ५ ऑगस्ट या माझ्या वाढदिवशी हारतुरे, पुष्पगुच्छ, जाहिरात, बॅनर्स यावर खर्च करण्याऐवजी आपणही शक्य तेवढी मदत वा निधी जमा करून पूरग्रस्तांना मदत करावी आणि आपल्या परिचितांनाही सांगावे, ही नम्र विनंती. आपल्या शुभेच्छांच्या आधारावरच मी आज येथवर वाटचाल केली आहे.प्रत्यक्षात लवकर आपली भेट होईलच.

**आपला कृपाभिलाषी,**
**प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल अध्यक्ष,**
**उत्तर रायगड जिल्हा, भाजप**

# सुडबुद्धीने सुरू असलेली कारवाई थांबवण्याची सर्वपक्षीय कृती समितीची मागणी

## ठाण्याचे महापौर, आयुक्तांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी करण्यात आलेल्या विराट सिडको भवन घेराव आंदोलनात सहभागी झालेल्या ठाण्यातील आगरी-कोळी बांधवांच्या घरे, बांधकामांवर तेथील महापालिकेने सुडबुद्धीने कारवाई सुरू केली आहे. पाडकामाची ही कारवाई त्वरित थांबवावी, अशी मागणी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ठाण्याचे महापौर नरेश म्हस्के आणि आयुक्त विपीन शर्मा यांची सोमवारी (दि. २) भेट घेऊन त्यांच्याकडे केली.



लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या शिष्टमंडळात अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार जगन्नाथ पाटील, सहचिटणीस दीपक म्हात्रे, खजिनदार जे. डी. तांडेल, पनवेलचे उपमहापौर जगदिश गायकवाड, नगरसेवक विजय चिपळेकर, राजेश गायकर, सदस्य गुलाब वझे, संतोष केणे, दशरथ भगत, अर्जुनबुवा चौधरी, गंगाराम शेलार, भाजपचे ठाणे शहर उपाध्यक्ष डॉ. राजेश मढवी, जिल्हा सरचिटणीस नीता पाटील, झोपडपट्टी सेल महिला अध्यक्ष उषा पाटील, ओबीसी सेल दिवा मंडल अध्यक्ष रोहिदास मुंडे, मोतीराम गोंधळी, आदींचा समावेश होता.

या वेळी कृती समितीच्या पदाधिकार्यांमनी सांगितले की, विकास आणि औद्योगिकीकरणाच्या नावाखाली ठाणे महानगरपालिका हद्दीतील भूमिपुत्रांच्या जमीन अल्प दरात घेऊन तेथे कंपन्या, टाऊन्स उभी राहिलेली आहेत, मात्र स्थानिकांचा गावठाण विस्ताराचा प्रश्न आजही प्रलंबित आहे. सध्या स्थानिकांना शेती नाही, घरे नाही, नोकरी नाही, व्यवसाय नाही. अशी परिस्थिती असताना केवळ लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावासाठी करण्यात आलेल्या आंदोलनात सहभागी झाल्याने आकसापोटी येथील आगरी-कोळी लोकांच्या घरांवर ती अनधिकृत आहेत असे सांगून .../२

# कोकणचा कॅलिफोर्निया व्हायला वेळ लागणार नाही : आ.महादेव जानकर



**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड, रत्नागिरी, सातारा येथील पूरग्रस्त तालुक्याचा पाहणी दौरा केल्यानंतर राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री तथा आमदार महादेव जानकर यांनी माणगांव येथील विश्रामगृहात सोमवार दि.२ रोजी पत्रकार यांच्या कडे संवाद साधला त्यावेळी बोलले की, कोकणचा कॅलिफोर्निया व्हायला वेळ लागणार नाही. या बाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लवकरच संपर्क करणार असून पूरग्रस्त गावांमध्ये सरकारची कार्यवाही कमी पडते. सामाजिक संघटना तसेच सर्वच राजकीय पक्ष यांच्या माध्यमातून योग्य ती मदत मिळत असून आमच्या सुद्धा पक्षाकडून जेवढ मदतीच काम करता येईल तेवढं कार्य माझे पदाधिकारी करत आहेत.


ज्या पूरग्रस्त विभागात गेलो त्या ठिकाणी असलेल्या जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना रियल पंचनामे करण्यासाठी सांगितले असून लवकरच शासनाकडून मदत मिळाली पाहिजे इतकी भयानक अवस्था निर्माण झाली आहे. अशी वेळ परत कोकणावर येऊ नये याकरिता उपाययोजना केंद्र व राज्य शासनाने केली पाहिजे. सरकार कोणचे ही असू परंतु लवकरच मदत होणे गरजेचं आहे.

कोकणातील पाणी हे दुष्काळी तालुक्यातील गावांना दिले .../२

# उरण-द्रोणागिरी नोड विभागातील पथदिव्यांखाली अंधार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड वसाहत विभागातील पथदिवे गेले अनेक महिन्यापासून बंद आहेत. त्यामुळे रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांना कामगारांना काळोखाचा सामना करावा लागत असून लुटमारीची भिती निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांची सुरक्षा धोक्यात आल्याचे दिसून येत आहे.



उरण तालुक्यातील सिडकोचा द्रोणागिरी नोड विभागात उभ्या राहिलेल्या गगनचुंबी इमारतींमुळे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे.जेएनपीटी बंदराच्या अनुषंगाने तालुक्यात विविध गोदामे साकारण्यातअली आहेत. या विभागातील रस्त्यावर वाहतूकी बरोबरच नागरिकांची कामगारांची मोठ्या प्रमाणात रेलचेल सुरू आहे. द्रोणागिरी नोड विभागात गोदामामध्ये आयत निर्यातचे काम उशिरा पर्यंत होत असल्याने गोदामातील कामगारांना या रस्त्यावरून रात्री अपरात्री ये जा करावी लागत आहे.

एकीकडे सिडको विकासाकडे वाटचाल करत आहे. मात्र दुसरीकडे सिडकोने या रस्त्यावर लाखो रुपये खर्च .../२

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून झालेल्या खुरावले फाटा ते वाघोशी रस्त्याची दुर्दशा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अवघ्या एका वर्षाच्या आत सुधागड तालुक्यातील खुरावले फाटा ते वाघोशी या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून अडीच कोटी रुपये निधी खर्च करून झालेल्या रस्त्याची प्रचंड दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. रस्त्यासाठी वापरलेले समान उन्मळून बाहेर पडले आहे. तर रस्ता जागोजागी खचला आहे. यामुळे येथून प्रवास करणे देखील जिकरीचे झाले आहे. रस्त्याची दाणादाण उडालेली पाहून ग्रामस्तांनी संताप व्यक्त केलाय.



भेरव जिल्हा परिषदेच्या शाळेपासून दोनशे मीटर च्या अंतरापर्यंत, तर माध्यमिक विद्यालय वाघोशी ते वाघोशी गाव इथपर्यंतच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. भेरव अंबा नदीच्या पुलाजवळ रस्त्यावरचा डांबर व खडीचा थर पाण्यात वाहून गेला आहे. अशा अनेक ठीक ठिकाणी रस्त्याची दुरावस्था झाली आहे. यावरून लक्षात येते की रस्त्याला वापरलेले मटेरियल अल्प प्रमाणात वापरून निकृष्ठ प्रतीचे वापरण्यात आले असावे.

रस्त्याचे काम चालू असताना स्थानिक नागरिकांनी .../२

# सोनेरी स्वप्नांकडे...

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतीय महिला क्रीडापटूंची कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी होत आहे. पहिल्याच दिवशी मीराबाई चानूने वेटलिफ्टिंगमध्ये रौप्यपदक मिळवून दिले. त्यानंतर पदकाची सर्वाधिक आशा असलेल्या बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूनेही रविवारी ब्राँझपदक मिळवून भारताची पदकसंख्या एकाने वाढविली. लव्हलिना बोर्गेहेन या मुष्टियुद्धपटूनेही उपान्त्य फेरीत धडक मारून, किमान ब्राँझपदक निश्चित केले. तिची पुढची लढत बुधवारी असून, तिने अंतिम फेरीत प्रवेश करून भारताला सुवर्णपदक मिळवून द्यावे, अशीच तमाम देशवासीयांची इच्छा असणार. नेमबाजी आणि तिरंदाजीत आपल्या क्रीडापटूंनी निराशा केली असली, तरी महिला हॉकी संघाने सोमवारी चमकदार कामगिरी करीत, थेट ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाला धूळ चारली आणि दिमाखात उपान्त्य फेरीत प्रवेश केला. भारतीय पुरुष हॉकी संघाने एकेकाळी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करून, आठ सुवर्णपदके मिळविली आहेत, हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे. अर्थात, शेवटचे सुवर्णपदक मिळवूनही आता ४१ वर्षे झाली. त्याआधी १९७२ मध्ये, म्हणजे म्युनिक ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाने उपान्त्य फेरीत प्रवेश केला होता. यंदा तब्बल ४९ वर्षांनी भारतीय पुरुष संघानेही उपान्त्य फेरी गाठली आहे, हे कौतुकास्पदच! हे सांगायचे कारण म्हणजे, एकेकाळी ऑलिम्पिकमध्ये वर्चस्व गाजविणाऱ्या पुरुष संघाची ही अवस्था असताना, महिला हॉकी संघाकडे कुणी पदकाच्या आशेने पाहतही नव्हते. या स्पर्धेतही पहिले तीन सामने राणी रामपालच्या संघाने गमावलेच होते. त्यानंतर मात्र, आयर्लंड आणि दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून राणीच्या सैन्याने जोरदार आगेकूच करीत, बाद फेरीत प्रवेश मिळविला. चौथ्या क्रमांकावर राहिल्याने भारतीय संघाची लढत दुसऱ्या गटात सर्व सामने जिंकून अव्वलस्थानी असणाऱ्या ऑस्ट्रेलियाशी ठरली. ऑस्ट्रेलियाचा पुरुष व महिला असे दोन्ही हॉकी संघ तगडे आहेत; त्यामुळे सोमवारच्या लढतीत भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाला किमान झुंज तरी द्यावी, एवढीच जाणकार हॉकीप्रेमींची अपेक्षा होती. प्रत्यक्षात राणी व तिच्या लढवय्या रणरागिणींनी ऑस्ट्रेलियाला १–० असे पराभूत केले आणि ऐतिहासिक विजय नोंदवला. भारतीय महिला संघ ऑलिम्पिकसाठी आतापर्यंत केवळ दोनदा पात्र ठरला होता. टोकियो ऑलिम्पिक हे तिसरे. तिसऱ्याच प्रयत्नात या संघाने थेट उपान्त्य फेरी गाठून भीमपराक्रम गाजवला आहे. सामना संपल्यावर भारतीय संघाचे प्रशिक्षक जो मरीन यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. राणी आणि तिच्या संघाने एकच जल्लोष केला. ऑस्ट्रेलियाच्या खेळाडू तर सुन्न होऊन रडत होत्या. राखेतून फिनिक्स पक्ष्याने भरारी घ्यावी, तसे यश या मुलींनी मिळविले, म्हणून भारतीय संघाच्या या विजयाचे मोल अधिक आहे. भारताच्या गेल्या काही ऑलिम्पिकमधील कामगिरीचा आढावा घेतला, तर महिला क्रीडापटूंची कामगिरी दिवसेंदिवस उंचावत आहे. या खेळाडूंवर अधिक मेहनत घेण्याची, त्यांच्या जिद्दीला बळ देण्याची गरज आहे. मीराबाई किंवा लव्हलिना या खेळाडू आसाम, मणिपूर, मिझोराम, नागालँड यांसारख्या ईशान्य भारतातील छोट्या राज्यांतून आल्या आहेत. मीराबाई घरी पोहोचली, तेव्हा तिचे साधेसे घर अनेकांनी टीव्हीवर पाहिले असेल. जमिनीवर मांडी घालून भाताचे ताट समोर घेऊन जेवणारी मीराबाई कोट्यवधी भारतीय मुलींना आपलेच आरशातले प्रतिबिंब वाटली असेल. महिला हॉकीपटूंमधल्या अनेक जणी अगदी छोट्या शहरांत राहणाऱ्या, तुमच्या–आमच्यासारख्या साध्या घरांत राहणाऱ्या आहेत. बॅडमिंटनसारख्या खेळात किती रक्त आटवावे लागते, हे तो खेळ कधी तरी खेळणाऱ्यांनाच समजू शकेल. सिंधू वयाच्या आठव्या वर्षापासून केवळ या एकाच खेळासाठी जणू समर्पित झाली आहे. आपल्या देशात क्रीडा संस्कृतीचा अभाव आहे, हे मान्यच; मात्र गेल्या काही वर्षांपासून हे चित्र आशादायकपणे बदलते आहे. भारताला १९५३ मध्ये खाशाबा जाधवांनी कुस्तीत ब्राँझपदक मिळविल्यानंतर वैयक्तिक पदक मिळविण्यासाठी १९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकची वाट पाहावी लागली; मात्र पुढच्याच २००० च्या सिडनी ऑलिम्पिकमध्ये वेटलिफ्टर कर्णम मल्लेश्वरीने ब्राँझपदक मिळवून, ऑलिम्पिक पदक मिळविणारी देशाची पहिली क्रीडापटू होण्याचा मान मिळविला. गेल्या रिओ ऑलिम्पिकमध्ये तर सिंधू आणि साक्षी मलिक या दोन मुलींमुळेच भारताला पदकतक्त्यात स्थान मिळविता आले होते. मुली मुळातच चिवट आणि हार न मानणाऱ्या असतात. आपल्या विशाल देशात तर कित्येक लहान गावांत, शहरांत अशा किती तरी गुणवान खेळाडू असतील. त्यांच्यातील गुणवत्ता जोखून, क्रीडा क्षेत्राने त्यांच्यात योग्य ती गुंतवणूक केली, प्रामाणिकपणे मेहनत केली, उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या, तर या मुली उद्या पदकांमधल्या सोन्याची लयलूट करतील यात शंका नाही.

# महाड पूरग्रस्त दरडग्रस्तांना उरण सामजिक संस्थेचा मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण सामाजिक संस्थेने महाड पूरग्रस्त दरडग्रस्त भागात मदतकार्य अभियान राबवले. संस्थेच्या कार्यकर्त्यांची टीम यासाठी गेले काही दिवस झटत होती. जवळपास १०० हुन अन्न धान्य यासह जीवनावश्यक वस्तूंचे संच, कपडे, औषधे, भांडी, चटई, ब्लँकेट, चादर, टॉवेल, पिण्याचे पाणी अशी मोठ्या प्रमाणातील मदतीचे वाटप करण्यात आले.

महाड शहरासह सावित्री, काळ नदीकाठच्या गावामध्ये पुराने थैमान घातलं होतं. यातून घरे, दुकानातील सर्व चीज वस्तूंचे मोठं नुकसान झालं आहे. तलीये गावात डोंगर खचून संपूर्ण गाव गाडलं गेलं. त्या गावाला भेट देऊन तिथं असलेल्या मृतांच्या नातेवाईकांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न या मोहिमेतील सारे कार्यकर्ते करत होते.

संपूर्ण महाराष्ट्रातून मदतीचा ओघ सुरू आहे. त्यामुळे जिथं मदतकार्य पोहचले नाही झालं नाही अशी गावं शोधून तिथल्या बाधित कुटुंबांना संस्थेने जमा केलेली मदत देण्यात आली. कसबे शिवथर घळ या महाड शहरापासून ३० किमी दुर्गम गावात नदीकाठची शेती पूर्णतः वाहून गेली. पुराच्या प्रचंड पाण्याने ठिकठिकाणी कोसळलेल्या दरडीने नदी प्रवाह बदलल्याने ही परिस्थिती ओढवली असल्याचे ग्रामस्थ सांगत होते. या गावात ७० कुटुंबांना मदत करण्यात आली. या मार्गातील नुकसानग्रस्त अनेक गरजू कुटुंबाना मदत केली. पूरग्रस्त खरवली, आसनपोई, गांधारपाले, काही आदिवासी वाड्या तसेच महाड शहरात कपडे, ब्लँकेट, चटई, अन्न धान्य किट, भांडी आदींचे वाटप करण्यात आले. हे वाटप करताना संस्थेच्या प्रत्येक सदस्यांच्या मनात त्या कुटुंबांना दिलासा देण्याची भावना होती. मदत देणारे आणि मदत स्वीकारणारे यातील आपण माध्यम असल्याचे संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार यांनी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष रुपेश पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. या अल्प मदतीने झालेल्या नुकसानाची भरपाई होऊ शकत नाही पण संकटात समाजासोबत उभं राहणं हे आमचं कर्तव्य आहे ते पार पाडण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे सांगितले. विलास गावंड, भरत मढवी वैभव पाटील यांनीही संवाद साधत पर्यावरणाचे महत्व अधोरेखित करताना विकास करताना निसर्ग पर्यायाने मानवी जीवन भकास होणार नाही याची काळजी घेण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी संस्थेचे विभागप्रमुख दिलीप पाटील, विनोद कदम, प्रशांत पाटील, हरीश पाटील, दौलत पाटील, माऊली देशमुख, सदाशिव जाधव, संदीप म्हात्रे, अरुण पाटील, योगेश घरत, नीलम घरत, मयुरी घरत, भाई तांडेल तसेच एन्जॉय ग्रुपचे अनिल ठाकूर, सिद्धार्थ फाळके, आनंद म्हात्रे, पप्पू तोरणे उपस्थित होते.

तत्पूर्वी संस्थेच्या वतीने जनतेला मदतीचे आवाहन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कॉ. भूषण पाटील, दिनेश घरत, नाना गायकवाड, सीमा घरत, प्रमोद ठाकूर , राजेंद्र मढवी, सुरेंद्र पाटील, सचिन वर्तक, अशोक पाटील यांनीही महाड येथील संकटग्रस्तांना मदत मिळवण्यासाठी खूप मेहनत घेतली.

# पोलादपूर तालुक्यासह प्रतापगड परिसरात मदत कार्यासाठी प्रशासन तत्पर : विठ्ठल इनामदार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या २२ जुलै २०२१ पासून पोलादपूर तालुक्यासह सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील प्रतापगड परिसरामध्ये पोल–ादपूर तालुक्यातून प्रशासनातर्फे तत्परतेने मदत कार्य सुरू करण्यात आले आहे. पोलादपूर तालुक्यातील घरे वाहून गेलेल्या लोकांना येत्या काही दिवसांपासून कन्टेनर केबिनची निवासव्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती आपत्कालीन परिस्थितीत प्रतिनियुक्तीवर असलेले पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी दिली.

तळिये, सुतारवाडी व केवनाळे येथे कंटेनर केबिनमध्ये राहण्याची तातडीची सुविधा करण्यात येणार आहे. जेएसडब्ल्यू कंपनीकडून येत्या काही दिवसांमध्ये कंटेनर केबिनची सुविधा उपलब्ध होणार असून याखेरिज, अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी सिमेंट पाईप उपलब्ध होणार आहेत. अनेक मोठ्या प्रकल्पांकडून कंटेनर केबिन उप–लब्ध होणार असल्याने तातडीची निवासव्यवस्था करण्यासाठी प्रशासनाकडून तत्परतेने प्रयत्न केले जाणार आहेत.



एलअँडटी कंपनीने लोडर, प्रोकलेन, जेसीबी तसेच पेणमधून प्रोकलेन व दोन जेसीबी व पुणे येथील निंबाळकर कंन्स्ट्रक्शन्स यांच्याकडून हैड्रा, प्रोकलेन व जेसीबी उपलब्ध करून तालुक्यातील रस्ते दुरूस्ती व दरडी हटविण्याच्या कामी उपयोग सुरू झाला आहे. नाम प्रतिष्ठानकडून कामथे येथे प्रोकलेन पाठविण्यात आला असल्याची माहिती देऊन पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी शेफ संजीव कपूर यांनी ताज हॉटेल मार्फत प्राप्त झालेली १० हजार तयार अन्नाची पाकिटे महाबळेश्वर तालुक्यात रवाना केली आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांच्यामार्फत राकेल, तांदूळ, गहू, तुरडाळ, पाठवली. महाबळेश्वर मध्ये दीड हजार फुड पाकिटे, सुका गोडा तिखट खाऊ आणि १०० गॅस सिलींडर तसेच १ हजार ब्लँकेटस, आरोग्य शिबीर अशा विविध सुविधा उपलब्ध करून केवनाळे ५ आणि साखर सुतारवाडी ६ मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाखांप्रमाणे ४४ लाख रुपये रोख मदतीचे वाटप त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये जमा केले आहे, अशी सविस्तर माहितीही यावेळी दिली.

एसडीआरएफ टीममध्ये २ अधिकारी ३२ जवान यांनी मदत केली तर भारतीय तटरक्षक दल पथकाच्या दहा जवानांनी माटवण मोहल्ला येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या १८ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी आणले. ८८ महसुली गावापैकी ७७ गावात विद्युत पुरवठा सुरू कामथे, ढवळे खोपड व लहुळसे या पाच गावांना अद्याप सुरू नाही तर उर्वरित चार गावांतील काही वाड्यांमध्ये विद्युतपुरवठा सुरू झाला असल्याची माहिती देत प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी लवकरच पोलादपूर तालुक्यातील जनजीवन पूर्वपदावर आणण्यात यश येईल, अशी माहिती दिली.

# नगरसेविका सुशिला घरत यांच्याकडून पूरग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या आवाहनानुसार पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' सभापती सुशिला जगदीश घरत यांनी महाड येथील पूरग्रस्तांना रेशन किट व पिण्याच्या पाण्याची मदत करून सेवा केली.

अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी पुराचे संकट आले. या परिस्थितीत पूरग्रस्तांना मदतीचा हात आणि धीर दिला जात आहे. सामाजिक जबाबदारी म्हणून भाजपच्या सुशिला घरत यांनी रविवारी महाड येथे जाऊन ६०० कुटुंबांना अन्नधान्याचे किट आणि पिण्याच्या पाण्याची मदत केली. यावेळी त्यांच्यासोबत मदत वितरित करण्यासाठी लक्ष्मी चव्हाण, रंजना पाटील, विद्या ससाणे, शारदा माने, राणी लोंढे, प्रविण चव्हाण, राहुल इंगोले, प्रदीप चव्हाण, श्रीराज, साहिल पाटील, निरज इंगोले, किरण पटेल, प्रविण वाडेकर, गणेश साळुंखे, रोहित इंगोले आदी उपस्थित होते. या मदतीबद्दल पुरग्रस्तांनी सुशिला घरत यांचे आभार मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पूरग्रस्तांसाठी ११ हजार ५०० कोटींची मदत जाहीर

अर्थसहाय्य :– जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत त्यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त ५०,०००/– रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. हस्तकला व हातमाग कारागीर यामध्ये बारा बलुतेदार, मुर्तीकार इत्यादी यांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.

दुकानदारांना अर्थसहाय्य :– जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा दुकानदारांपैकी अधिकृत दुकानदार यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त .५०,०००/– रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

टपरीधारकांना अर्थसहाय्य जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा टपरीधारकांपैकी अधिकृत टपरीधारकांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १०,०००/– रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. कुक्कुटपालन शेडकरिता अर्थसहाय्य कुक्कुटपालन शेडच्या नुकसानीसाठी ५०००/– रुपये इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

## सुडबुद्धीने सुरू असलेली कारवाई थांबवण्याची सर्वपक्षीय कृती समितीची मागणी

महापालिका कारवाई करीत आहे. बेकायदा बांधकामांना आमचा पाठिंबा नाही, पण ठाण्यात अशी अनेक अनधिकृत बांधकामे आढळून येतात. त्यांना मात्र अभय दिले जाते. एवढेच नव्हे तर काही बड्या मंडळींची अनधिकृत बांधकामे दंड आकारून नियमित केली जातात. मग एकाला एक न्याय आणि दुसर्याधला वेगळा असे का? जाणीवपूर्वक सुडबुद्धीने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

ठाण्यातील स्थानिक लोक बेकारीचे जीवन जगत आहेत. त्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे सोडून केवळ आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर महापालिकेने कारवाईचे सत्र सुरू केले आहे. त्याचा आम्ही निषेध करतो असे सांगून ही कारवाई ताबडतोब थांबविण्यात यावी, अशी मागणी महापौर आणि आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या वेळी कृती समितीच्या पदाधिकार्यां नी ठाण्यात पाहणी करून आढावाही घेतला.

## कोकणचा कॅलिफोर्निया व्हायला वेळ लागणार नाही : आ.महादेव जानकर

तर तेथील शेतकरी सदन होऊ शकतो. कोकणातील तरुण हा मुंबईला न जाता बागायती, फळबाग, शेती करून सुखी राहू शकतो. येथील तरुणांनी कर्ज घेऊन शेती व्यवसाय केला पाहिजे परंतु इथला तरुण नोकरीनिमित्त मुंबई जातो हे दुर्दैव आहे. कोकणातील पाणी हे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा येथील दुष्काळ असणाऱ्या तालुक्यात दिले तर त्या विभागात असणारी पाणी समस्या कायम दूर होऊ शकते. याबाबत रासपच्या वतीने केंद्र व राज्य सरकार जवळ चर्चा करण्यात येईल.

पूरग्रस्त ठिकाणी त्यांनी भेट दिली असता त्यांच्या निदर्शनास आले की, ज्या ठिकाणी कोण पोहचत नाही त्या ठिकाणी पहिला पत्रकार पोहचतो नंतर सर्व यंत्रणा पोहचते. यांना कोणी वाली नसतो. या पुरामध्ये व्यापारी वर्गाचे खूप मोठे नुकसान झाले असून शासनाने त्यांना परत व्यवसाय करण्यासाठी शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.

यावेळी यांच्यासोबत प्रदेश सरचिटणीस अण्णासाहेब रूपणवर,कोकण प्रदेश अध्यक्ष भगवान ढेबे,रायगड जिल्हा संपर्कप्रमुख संतोष ढवळे,रायगड जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा मनीषा ठाकूर,माजी जिल्हा अध्यक्ष संपत ढेबे, माणगाव तालुका अध्यक्ष रविंद्र सुतार, सूर्यकांत टेंबे उपस्थित होते.

## उरण–द्रोणागिरी नोड विभागातील पथदिव्यांखाली अंधार

करून बसविलेले हायमाटचे पथ दिवे गेले अनेक महिन्यापासून बंद असल्याने या विभागातील रस्ते काळोखाच्या साम्राज्यात बुडाले आहेत. त्यामुळे रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांची लुटमरीची भिती निर्माण झाली आहे.

या आगोदर काळोखाचा फायदा घेत या परिसरात अशा लुटमरीच्या घटना घडल्या असल्याचे कामगारांकडून सांगण्यात येत आहे. त्याचबरोबर रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांना ये जा करणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सिडकोने करोड रुपये खर्च करून बसविलेले पथदिवे लवकरात लवकर उजळावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून झालेल्या खुरावले फाटा ते वाघोशी रस्त्याची दुर्दशा

रस्त्याच्या निकृष्ठ कामाबद्दल आक्षेप देखील घेतला होता. परंतु प्रशासनाचे दुर्लक्ष, संबंधित खात्याचे अभियंता यांची अनुपस्थिती व प्रशासनाची ठेकेदाराला असलेली साथ यामुळे रस्त्याच्या कामाची अशी दुरावस्था झाल्याचे वंचीत बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी सांगितले. तसेच अशा ढिसाळ व निकृष्ठ दर्जाच्या कामाबाबत ठेकेदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्याची मागणी यांच्यासह स्थानिक करीत आहेत.

# नेरे प्रीमियम लीग २०२१ चा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नेरे प्रीमियर लीग २०२१ चा बक्षीस वितरण समारंभ नेरे हायस्कुल येथे नुकताच पार पडला आहे. यावेळी धडाकेबाज इलेव्हन संघाला भव्य चषक आणि रोख रकमेने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला जनसेवा संघ नेरेचे अध्यक्ष दत्तात्रय पाटील, नेरे ग्रामपंचायत सरपंच राजश्री म्हसकर, दर्शन ठाकूर, योगेश तांबोळी, शंकर ठाकूर, भास्कर कलोते, राम ठाकूर, अनिल पाटील, किसन खारके, राजाराम पाटील, प्रकाश घाडगे, दिपक पाटील, विनोद पाटील, प्रसाद चोरघे, निलेश खारके, केशव गवते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मे २०२१ मध्ये नेरे प्रिमीयर लिग क्रिकेट स्पर्धा पार पडली. मात्र बक्षीस वितरण समारंभ बाकी होता. हा कार्यक्रम ३१ जुलै रोजी पार पडला. यावेळी प्रत्येक सामन्यातील खेळाडूला मॅन ऑफ द मॅचचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मालिकावीर आणि उत्कृष्ट फलंदाज म्हणून परेश म्हस्कर तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून रोहन पाटील यांना गौरविण्यात आले. धडाकेबाज इलेव्हन हा संघ विजेता ठरला. तर उपविजेता सुयोग इलेव्हन हा संघ ठरला. यावेळी सरपंच राजश्री म्हसकर यांनी ग्रामपंचायततर्फे क्रिकेटच्या मैदानासाठी एक लाख रुपये देणार असल्याचे जाहीर केले. तर विजेत्या संघाने बक्षीस स्वरूपात मिळालेली रक्कम नेरे येथील हनुमान मंदिराच्या सुरू असलेल्या कामाला देण्याचे जाहीर केले.

# पनवेल लायन्सतर्फे पूर पिडीतांसाठी अन्नछत्र



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नुकत्याच आलेल्या अतिवृष्टीमुळे कोकणात अस्मानी संकट कोसळले आहे. त्यांची घरदारे उध्वस्त झाली आहेत. लायन्स क्लब ऑफ पन–वेल तर्फे महाड जवळील बिरवाडी भागातील आजूबाजूच्या वाड्यांमध्ये अन्नछत्र सुरू करुन या भागातील ग्रामस्थांना मोठा मदतीचा हात देण्यात आला आहे.

लायन्स क्लब ऑफ पनवेल तर्फे या भागातील ग्रामस्थांसाठी रोज सकाळी व सायंकाळी सुमारे हजार जणांना तयार जेवण देण्यात येते. आत्तापर्यंत ८ हजारांहून जास्त जणांनी या अन्नछत्राचा लाभ घेतला आहे. लायन अध्यक्ष सुयोग पेंडसे, सचिव मधुकर भगत, लायन अशोक गिल्डा, लायन नंदकिशोर धोतरे यांनी या भागात राहून खूप परिश्रम घेतले.

तसेच लायन लुईस कॉलेस्ते, लायन संजय पोतदार, लायन नागेश देशमाने, लायन स्वाती गोडसे, लायन सुरभी पेंडसे, लायन शोभा गिल्डा, लायन भावना जसवानी यांनीही हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. ला.डि. ३२३१ ए २ चे माजी प्रांतपाल ला.के.जे. पॉल, जी.एस. टी. चेअरमन ला. मनिष लडगे, रिजन चेअरमन ला. ज्योती देशमाने, नोडल ऑफिसर जी.एस.टी.ला. संजय गोडसे यांनी सुद्धा या अन्नछत्राला भेट देऊन समाधान व्यक्त केले आहे. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी बिरवाडी येथील वैभव सोहनी, शेखर सोहनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# नागोठण्यातील डॉक्टरांकडून महाडच्या परिसरात मोफत आरोग्य तपासणी

**दै.रायगड नगरी । वाकण**

महाडवासियांवर आलेल्या संकटामुळे संपूर्ण महाडकर हतबल झाले असतानाच त्यांना मदतीसाठी संपूर्ण महाराष्ट्र सरसावला आहे. अनेक भागातुन विविंध संस्था,दानशुर व्यक्ती तसेच खेडोपाड्यातुन मोठ्या प्रमाणात मदतीचा ओघ सुरू आहे. दिवसातून जवळपास हजारो गाड्या महाडकडे जाताना दिसत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नागोठणे विभागातील डॉक्टरांकडुन महाड जवळील भावे गावासह आजुबाजुच्या परिसरात मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नागोठणे विभागातील सुकेळी येथील डॉ.इरम शेख (एम बी बी एस) व डॉ.सुयोग जवके (बी ए एम एस) व त्यांच्या संपुर्ण टीम मार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सध्या महाडची परिस्थिती पुर्वपदावर येत असतानाच तेथे साचलेल्या कच–यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरल्यामुळे सध्या या परिसरात अनेक प्रकारचे आजार उद्भवत आहेत.यामध्ये मलेरिया, टायफाईड, डेंग्यू,लेप्टोस्पायरोसिस, त्वचेचे आजार असे अनेक आजार सुरु झाले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संघटनेच्या दातृत्वाने शिक्षकांचे डोळे पाणावले

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

प्रलयकारी निसर्ग प्रकोपाने महाड मधील सर्वच बेचिराख झाले. पुराच्या भक्ष्यस्थानी महाड व परिसरातील शाळाही पडल्या. पुराच्या पाण्याने बेचीराख झालेल्या खाजगी प्राथमिक शाळांना सहकार्याचा हात देण्यासाठी रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक, शिक्षकेतर शाळा संघटना सरसावली आहे. नुकतीच पूरामध्ये सर्वस्व गमावून बसलेल्या शाळांना व व कर्मचाऱ्यांना संघटनेच्या संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नधान्य व शैक्षणिक साहित्याचे मदतीचा हात देण्यात आला. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व शाळातील शिक्षकही पूरते भारावून गेले अन् अचानकपणे नकळत सर्वांच्याच डोळ्याच्या कडा पाणावल्याण.



नुकत्याच झालेल्या प्रलयकारी निसर्ग प्रकोपाने महाडला पुराचा वेढा पडला. यामध्ये नागरिकांचे संसार पुराच्या पाण्याने बेचिराख झाले. पुराच्या तडाख्यात महाड खरीवली, पोलादपूर मधील शाळाही पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या. सर्वांकडून मदतीचा ओघ येत होता. मात्र शाळांमधील कर्मचारी व शाळांना आवश्यक असणारे साधन सामुग्री देण्याचा मनोदय रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर संघटनेने हाती घेतला. यामध्ये पूर्णपणे उध्वस्त झालेल्या शाळांना शैक्षणिक साहित्याचे मदत सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली मराठी शाळेतील शिक्षक बांधवांनी मदतीचा हात देऊन खारीचा वाटा उचलला आहे. संघटनेच्या वतीने पूरग्रस्त शिक्षक बांधवांना अन्नधान्य व आवश्यक वस्तूंच्या किटचे वाटप महाड येथे जाऊन संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दर्दमंड उर्दू प्राथमिक शाळा, वा.गो.गाडगीळ प्राथमिक शाळा, संस्कार धाम मराठी प्राथमिक शाळा खरवली, प्रभावती रा.शेठ प्राथमिक शाळा पोलादपूर, श्रीमती गे.ब.जैन मराठी प्राथमिक शाळा लाडवली, अ.ना.कोटीभास्कर प्राथमिक शाळा बिरवाडी या पूरग्रस्त शाळेत जाऊन करण्यात आले. यावेळी शिक्षक बांधवांना अन्नधान्य वस्तूचे कीट व शालेय वस्तूंची शैक्षणिक वस्तू देत असताना अत्यंत भावनिक क्षण निर्माण झाल्याने पूरग्रस्त शिक्षक व मदतीचा हात देणाऱ्या संघटनेच्या शिक्षक सदस्यांचे ही डोळे नकळत पाणावले गेले. शिक्षक संघटनेने देऊ केलेल्या शैक्षणिक व अन्नधान्य साहित्यामुळे शिक्षक सदस्य पुरते भारावून गेले. यावेळी संघटनेच्या वतीने महाड पोलादपूर बिरवाडी, खरी वली येथील शाळांना भेटी देऊन शाळांच्या पूरग्रस्त स्थितीचा आढावा घेऊन पाहणी करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम, उपाध्यक्ष मीनाक्षी कर्वे, उपाध्यक्ष सुधाकर जैवळ, सरचिटणीस यशवंत मोकल, सचिन सावंत, सुगिद्र म्हात्रे, रीनेश गावित, देवेंद्र केळुस्कर, संजय पाटील, दत्तात्रेय पगार, विकास मांढरे, दीपक सूर्यवशी, पिराजी पालवे, प्रमोदिनी पाटील, अरुण जोशी, राजेश्री शेवाळे हे शिक्षक बांधव उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## ज्युपिटर गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्युपिटर गाडीची चोरी झाल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीत घडली आहे.

संदिपकुमार तिवारी (वय–४२) यांची ३० हजारांची टिव्हीएस ज्युपिटर गाडी क्र. एमएच ०५ बीडब्लू ४३५१ लाल रंगाची हि सिल्व्हर स्प्रिंगसमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

इंग्रज राजवटीत दीड हजार गावांमध्ये प्रति सरकार चालविणारे थोर स्वातंत्र्यसेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांची १२१ वी जयंती मंगळवारी, (ता.३ ऑगस्ट रोजी ) रायगड जिल्हा परिषदेत साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

क्रांतीसिंह नाना पाटील यांचे स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान होते. महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या असहकार चळवळीतील सहभागापासून 'प्रति सरकार' आंदोलनापर्यंत त्यांनी लढा दिला.

## मनसेकडून महाड येथील पुरग्रस्त, दरडग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । पेण**

कोकणासह रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस, ढगफुटी सारख्या पडलेल्या पावसामुळे महाड, तालुक्यात पूर व दरड कोसळण्याच्या घटनेने असंख्य कुटुंब उध्वस्त झाली आहेत.

जोरदार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. निसर्गाच्या अचानक आलेल्या संकटात अनेक मदतीचे हात पुढे येत असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मनसेचे जिल्हा संघटक गोवर्धन पोलसानी, रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली मनसेचे पेण तालुकाध्यक्ष अंकुश म्हात्रे, तालुका सचिव मनोहर पाटील, कासु विभाग अध्यक्ष मिथुन पाटील आदि मनसेच्या कार्यकर्त्यांनी महाड येथील दरड व पुरग्रस्ताना अन्नधान्य व जिवनावश्यक वस्तुचे वाटप केले.

अचानक आलेल्या पुरामुळे अनेक कुटूंबाचे सर्वच वाहून गेले आहे. अश्यावेळी या नागरिकांना मदत करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्याच आवाहनाला प्रतिसाद देत पेण तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे जिवनावश्यक वस्तुचे वाटप केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## माथाडी कामगार संघटनेच्या वतीने महाड येथे श्रमदान

**दै.रायगड नगरी । वाकण**

रायगडचे कर्तव्यदक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रेरणेने तसेच पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे व आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन मंगळवार दि. २७ जुलै रोजी पूरपरिस्थिती निर्माण झालेल्या महाड परिसरात महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार संघटना नागोठणे तालुका रोहा यांच्या वतीने श्रमदान करून माथाडी कामगार संघटनेनेच्या कामगार वर्गाने सामाजिक बांधिलकी निभावली. दरम्यान यापुढे ज्या ठिकाणी काही अडचण असेल तेथे जेव्हा आमची गरज लागेल तेव्हा आम्ही त्याठिकाणी हजर राहून जनसेवा करू अशी भावना माथाडीच्या कामगार वर्गाने व्यक्त केली. महाड येथील श्रमदान प्रक्रियेत माथाडी कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष गायकवाड, उपाध्यक्ष दिनेश घाग, सुनील लाड, सुरेश बडे, अर्जुन निरगुडे, राजेश निरगुडे, सुनील पिंगळे, मोहन पिंगळे संतोष शीद, किरण शीद, चंद्रकांत शीद, राजेश पिंगळे, जणू पिंगळे, अशोक पिंगळे आदींनी सहभाग घेतला होता.


### माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता.कर्जत, जि.रायगड–४१०१०२**

जावक क्र.११७१ दि.०३/०८/२०२१

### ई–निविदा सूचना


माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि.रायगड हे १) माथेरान नगरपरिषद हद्दीतील घनकचरा संकलन, वहन व प्रक्रिया केंद्रावरील कामासाठी मनुष्यबळ पुरविणे. या कामाचे ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रक इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**सही/–**
**(डॉ.प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**


## काळसेकर पॉलिटेक्निकद्वारा आयोजित नि:शुल्क करीअर मार्गदर्शनपर ऑनलाईन कार्यक्रमास विद्यार्थी वर्गातून प्रचंड प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंजुमन–ए–इस्लाम या प्रख्यात सामाजिक आणि शैक्षणिक संस्थेच्या एन. बी. ए.मानांकित अब्दुल रझाक काळसेकर पॉलिटेक्निक, पनवेलद्वारे नुकतेच १० वी, १२ वी आणि आय. टी. आय उत्तीर्ण विद्यार्थ्यासाठी नि:शुल्क करीअर मार्गदर्शनपर ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थी वर्गातून उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद लाभला.




आपल्या दर्जेदार तांत्रिक शिक्षणासाठी प्रसिद्ध असणारे काळसेकर पॉलिटेक्निक नेहमीच अनेक विद्यार्थीपूरक उपक्रमांचे आयोजन करीत असते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी काळसेकर पॉलिटेक्निक द्वारे दहावी, बारावी आणि आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या शंका निरसनासाठी ऑनलाईन माध्यमातून करिअर मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते राज्यभरातून पाचशेहून अधिक विद्यार्थी पालक शालेय मुख्याध्यापक शिक्षक तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन प्राचार्य आणि शिक्षक वृंद यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

अंजुमन– ए– इस्लाम संस्थेच्या नवी मुंबई शिक्षण संस्थांचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन बुर्हान हारीस यांच्या अध्यक्षतेत तसेच संस्थेचे शालेय समिती सदस्य इक्बाल कवारे, शोएब जामखानवाला, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ.अब्दुल रझाक होनुतागी यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न या कार्यक्रमात अनेक शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेष मार्गदर्शक – डी. टी. ई., मुंबईचे जे.आर. नीखाडे, विशेष कर्तव्याधिकारी वाय.बी.जामनिक, सौ.सदफ शेख, रिलायन्स जिओचे डॉ.मुनीर सय्यद यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षकांशी संवाद साधत करिअरच्या नवनवीन वाटा, पदविका अभ्यासक्रम, त्याची प्रवेश प्रक्रिया, पुढील उपलब्ध संधी आदी विषयांवर सखोल मार्गदर्शन करत प्रस्तुत शंकांचे समाधान देखील केले. सुमारे ३तास चाललेल्या या कार्यक्रमातील उपस्थितांना इ – प्रमाणपत्रही देण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.झहीर आय.काझी, व जनरल सेक्रेटरी जी.ए.आर. शेख यांच्या प्रेरणा आणि पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमास काळसेकर पॉलिटेक्निक चे प्राचार्य प्रा. रमझान खाटीक यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. लॉकडाऊन,परीक्षा स्थगिती आदी पार्श्वभूमीवर काळसेकर पॉलिटेक्निक द्वारे आयोजित हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी नक्कीच मदतीचा हात ठरला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबाबत विद्यार्थी आणि पालक वर्गातून काळसेकर पॉलिटेक्निक चे आभार मानले जात आहेत.

## ग्रामीण समूहांच्या पुनर्वसनासाठी 'सीएसआर' उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टाटा कॅपिटल या टाटा समूहातील प्रमुख वित्तीय सेवा कंपनीने ग्रामीण महाराष्ट्र, तामिळनाडू आणि झारखंडमध्ये व्यावसायिक विकास प्रकल्पांची मालिका हाती घेतली आहे. या तीन राज्यांमधील समुदायांमध्ये पुनर्वसन आणि रोजगाराच्या संधी प्रदान करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असून 'सीएसआर' उपक्रमांतर्गत 'टाटा कॅपिटल'ने 'ग्रीन स्विच' आणि 'जलआधार' हे दोन प्रकल्प हाती घेतले आहेत.

या अनुषंगाने ग्रीन स्विच प्रकल्पामध्ये हवामान बदलातील शाश्वतता, आरोग्य, कौशल्य विकास, शिक्षण आणि उद्योजकता यावर लक्ष केंद्रित करण्यात येते. स्थानिक लोकांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाण्याचे स्त्रोत पुरवण्याच्या उद्देशाने जलआधार प्रकल्प उभारलेला आहे. या प्रकल्पातून तांत्रिक एकत्रीकरण आणि समुदायाची सहभाग यांस प्रोत्साहन देण्यात येते. हे दोन्ही प्रकल्प सध्या महाराष्ट्र, तामिळनाडू आणि झारखंडमध्ये कार्यरत आहेत आणि येत्या काही वर्षांत त्यांचा विस्तार करण्याचा विचार सुरू आहे. 'टाटा कॅपिटल'च्या सीएसआर उपक्रमांविषयी बोलताना'टाटा कॅपिटल'चे सीएसआर विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्रीधर सारथी म्हणाले, स्थानिक समुदायांवर आणि त्यांच्या परिसंस्थेवर प्रभाव पडेल, अशा प्रकारे वंचितांचे परिवर्तन करण्यास टाटा कॅपिटल वचनबद्ध आहे. भविष्यातील आरोग्यदायी आणि शाश्वत वातावरण निर्माण करण्यासाठी लोकांना नवीन कौशल्ये शिकण्यास सक्षम बनविण्यातस्वयंसेवी संस्थांसोबत, कार्यक्षम तंत्रज्ञानासह काम करण्याच्या आमच्या सहयोगी दृष्टिकोनाने महत्त्वपूर्ण भूमिका बजा–वली आहे. आम्ही आपले सीएसआर प्रकल्प भारतभर विस्तारित करीत आहोत आणि त्यातून आम्ही लोकांच्या जीवनात व राहणीमानात अर्थपूर्ण बदल घडवून आणत आहोत.



## अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा येथे शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील विदयापीठ परिक्षांमध्ये शंभर टक्के निकाल लागला असून घवघवीत यश संपादित करणा–या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारभांचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी अंजुमन इस्लाम जंजिराचे अध्यक्ष इरफान शहा, उपाध्यक्ष अजिम खानजादा सहसचिव अ. रहीम कबले, खजिनदार अल्ताफ मलिक महाविदयालय विकास समितीचे अध्यक्ष जैनुद्दीन कादीरी, इम्रान मलिक, तौसिफ फत्ते, मुरूड ग्रामिण रूग्णालयाचे डॉ. काझी व महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख आदि मान्यवर उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ चा तृतीय वर्ष अंतिम सत्र परिक्षामध्ये रसायनशास्त्र विभागात प्रथम निहा दामाद, द्वितीय नमिरा कागदी, तृतीय मिदहत धनसे, वनस्पतीशास्त्र विभागात प्रथम इशरत मोझर, द्वितीय आयेशा शेनवी, तृतीय मुस्कान हमदुले तसेच कॉम्प्युटर सायन्स विभागात प्रथम इफरा दाते, द्वितीय दानिया शेनवी, तृतीय अम्मारा हवालदार क्रंमाक प्राप्त केले. अंजुमन इस्लाम जंजिरा व महाविदयालयाच्या व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अंजुमन इस्लाम जंजिराचे अध्यक्ष इरफान शहा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## स्वराज्य प्रतिष्ठान रायगड संघटनेच्या वतीने महाडकरांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । तळा**

स्वराज्य प्रतिष्ठान रायगड संस्थापक/अध्यक्ष भास्करभाई कारे यांच्या नेतृत्वाखाली १ ऑगस्ट २०२१ रोजी कोकणातील महाड पूरग्रस्त बंधू– भगिनींना एक हात मदतीचा पुढे करीत सामाजिक बांधिलकीच्या भावनेने मदत करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून त्या भागातील माहिती घेताना काही गोष्टी निदर्शनास आल्या की गेली ११ दिवस तेथील पूरग्रस्तांना रोजच्या रोज गरजेची असलेली जीवनावश्यक वस्तू वाटप करणे गरजेचे आहे. लक्षात घेऊन स्वराज्य प्रतिष्ठान रायगड या संघटनेच्या वतीने महिलांना कपडे, पुरुषांना कपडे तसेच पाण्याच्या बॉटल्स, बिस्कीट, मेणबत्ती, झाडू,, टॉर्च, साबण, फिनेल, ब्लँकेट, चादर, चटई इत्यादी वस्तू स्वरूपात वाटप करण्यात आले. त्याचबरोबर पूरग्रस्त बांधवाना दिलासा देत त्यांना धीर दिला. गावागावातून जात असताना लोकांच्या घरात जाऊन वस्तू स्वरूपात मदत करत असताना त्या भागात वीज, पाणी, अत्यावश्यक वस्तूंची नितांत गरज आहे, शासन प्रशासनाने त्वरित त्यावर लक्ष केंद्रित करावे. असे आवाहन संस्थेच्या वतीने विनंती केली आहे तसेच कोकणातील या पूरग्रस्तांना आर्थिक व वस्तू स्वरूपातमदत केली त्या बद्दल स्वराज्य प्रतिष्ठान रायगडने मनापासून धन्यवाद व्यक्त केले.


### हरकत नोटीस

माझे अशिल श्री.गंगाराम काळुराम म्हात्रे, रा.जसखार, पो.जेएनपीटी, तालुका : उरण, जिल्हा : रायगड या हरकत नोटीसीने तमाम जनतेस कळवितात की, उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात दि.चौ.अर्ज १०७/२०२१ या अर्जात रमाकांत नारायण म्हात्रे व इतर यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केलेला आहे. नोटीस मधील संपादीत जमिनीचे अॅवार्ड नंबर व युनिट केस नंबर खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जसखार, पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस नं. | अॅवार्ड नं. |
|---|---|
| २३८ | ५५ |
| १९९ | २०२ |
| १९९ | २०१ |
| १९९ | ४८ |

सदर युनिट केस मधील मिळकती या जाहीर नोटीस देणारे श्री.रमाकांत नारायण म्हात्रे व त्यांचे वडील कै.नारायण दत्तू म्हात्रे यांच्या मालकीचे नाहीत व या मिळकती संबंधी रे.मु.नं. हा मे दिवाणी २०१४/२९४ न्यायाधिश उरण यांचे कोर्टात प्रलंबित आहे. म्हणून हरकतदार दै.वादळवारा मध्ये दि.२७/०७/२०२१ जाहीर नोटीसला हरकत घेत आहे. या मिळकती संबंधी कोणीही खरेदी अथवा विक्री याचा व्यवहार करू नये जर केल्यास हरकतदार त्यास जबाबदार राहणार नाही.

दि.०३/०८/२०२१

**सही/–**
**हरकतदार तर्फे वकील**
**अॅड.मनिष पाटील**
**मु.पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल–कोळीवाडा भागाकडील खालील तपशिलाप्रमाणेची वर्णन असलेली मिळकत ही त्यासमोर लिहिलेल्या इसमांचे खुद्दचे नावे मे.उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, पनवेल यांचे सिटी सर्वे रेकॉर्डला नोंदलेली आहे ती येणेप्रमाणे.

**मिळकतीचा तपशिल**

| मौजे | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| मौजे : पनवेल ता.पनवेल, जिल्हा : रायगड | सि.स.नं.१०९५ + १०९४ बी | ४८.५ चौ.मी. | संतोष पांडुरंग बेर्डे |
| | सि.स.नं.१०९५ + १०९४ बी वरील तळमजला व त्यावरील एकमजली माडीचे बांधकाम | ६२.९१ चौ.मी. बांधीव | श्रीम.शालिनी पांडुरंग बेर्डे |

सदरहू वरील वर्णनाची मिळकत व त्यावरील बांधकाम यासह व त्यांचे बरोबस्त हक्कासह आम्ही त्यांचेकडून कायम मालकी हक्काने खरेदी करणेचे निश्चित बोलणी करून तशा प्रकारचा व्यवहार ठरलेला आहे. सबब वरील वर्णनाच्या मिळकती संबंधात त्यांचे हक्कासंबंधी अगर इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, लिज, लिन यापूर्वी अस्तिवात असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सकृतदर्शनी कागदपत्राचे पुराव्यासह खालील पत्यावर समक्ष / पोस्टाद्वारे हरकती देण्याची व्यवस्था करावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत आम्हास प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून खरेदीखतान्वये व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीस आम्ही जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३/०८/२०२१

**सही/–**
**मयुर सुनील पंडीत**
**१०९२, पंडीत निवास, कोळीवाडा**
**पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.८६५५५३४६९३**



श्री.भाकरे सो.कोर्ट
अर्जदारातर्फे वकील अॅड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०९/२०२१

कै.मधुसूदन बाळकृष्ण दळवी (मयत) यांचे वारस
१) सौ.पल्लवी चरणराज जिमन
पुर्वाश्रमीचे नाव पल्लवी मधुसूदन दळवी
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.प्लॉट नं.१३५, १३६, १३७ साई नारायण बाबा पॅलेस
फ्लॅट नं.१०२ ए विंग, पहिला मजला,
सेक्टर १० नवीन पनवेल तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, राज्य : महाराष्ट्र
२) सौ.सुलभा अमित राणे
पुर्वाश्रमीचे नाव सुलभा मधुसूदन दळवी
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.४१३ ए विंग, शिव प्रसाद सीएचएस लि.अंधेरी
लिंक रोड लक्ष्मी नगर कॅनरा कंपनी घाटकोपर
ईस्ट मुंबई ४०००७५ राज्य : महाराष्ट्र
३) सौ.प्राजक्ता रोहित पाटील
पुर्वाश्रमीचे नाव प्राजक्ता मधुसूदन दळवी
वय : २७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.प्लॉट नं.१३५, १३६, १३७ साई नारायण बाबा पॅलेस
फ्लॅट नं.१०२ ए विंग, पहिला मजला,
सेक्टर १० नवीन पनवेल तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, राज्य : महाराष्ट्र अर्जदार क्र. १ ते ३
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसच्या माध्यमातून सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.मधुसूदन बाळकृष्ण दळवी यांचे वारस अर्जदार क्र.१ ते ३ या तिन्ही ही मुली आहेत. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.मधुसूदन बाळकृष्ण दळवी यांचा मृत्यू दि.३०/११/२०१८ रोजी हिरानंदानी फोर्टीज हॉस्पिटल वाशी येथे निधन झाले.

**कै.मधुसूदन बाळकृष्ण दळवी यांची खालीलप्रमाणे मिळकत**
**प्लॉट नं.१३५, १३६, १३७ साई नारायण बाबा पॅलेस**
**कारपेट क्षेत्र ४०२, फ्लॅट नं.१०२ ए विंग, पहिला मजला,**
**सेक्टर १० नवीन पनवेल तालुका : पनवेल,**
**जिल्हा : रायगड, राज्य : महाराष्ट्र**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **सही/–**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## उभ्या ट्रकला मारुती गाडीची ठोकर तीन जण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवरील चिखले गावाच्या हद्दीत नादुरूस्त ट्रकला पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या मारूती गाडीने धडक दिल्याने झालेल्या अपघा-तात गाडीतील तीन प्रवासी जखमी झाले असून गाडीचेही नुकसान झाले आहे.

चिखले गावाच्या हद्दीत ब्रीजवर एक नादुरूस्त ट्रक उभा होता. परंतु त्याच्यामागून भरधाव वेगाने मारूती सुझुकी गाडी आली व गाडीतील चालकाने उभ्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. या धडकेत शंकर राम अवजी (वय-३०, रा.- सूकापूर), प्रकाश बन्सी परिहार (वय-२९, सिवूड), भरत करण परिहार (वय-३२, ठाणे) हे जखमी झाले आ-हेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पोलादपूरच्या पूरबाधित कुटुंबांना अन्न-धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरातील पूरबाधित कुटूंबियांना महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. यावेळी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करताना आ. गो-गावले यांच्यासोबत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पोलादपूर शहरप्रमुख सुरेश पवार, माजी नगराध्यक्ष व माजी नगरसेवक तसेच विभागप्रमुख लक्ष्मण मोरे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी पोलादपूर शहरातील पूरग्रस्तांची आस्थापूर्वक विचारपूस करीत त्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक साहित्याचे वाटप केले. पुरबाधित कुटूंबांना कोणतीही मदत लागल्यास खात्रीपुर्वक करण्याचे पोलादपूरकरांना आश्वासन देत आ.गोगावले यांनी अडचणीत असलेल्या प्रत्येक कुटुंबाच्या पाठीशी ठाम उभे असून पुरामुळे झालेल्या नुकसानीची जास्तीत जास्त नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

# महाड तालुक्यातील दरडग्रस्त तळीये गावातील मृतांचे सामुदायिक उत्तरकार्य

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाड तालुक्यातील तळीये गाव दि.२२ जुलैला अतिवृष्टीमुळे दरड कोसळून उद्ध्वस्त झाले होते. दि.२५ जुलै पर्यंत दरडीच्या ढिगाऱ्यातून ५३ मृतदेह बाहेर काढण्यात आले होते. मात्र, चौथ्या दिवशी सकाळी बचावकार्य थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यात ३१ जण बेपत्ता असल्याची नोंदविण्यात आले. या सर्वांचे तेराव्याचे उत्तरकार्य तळिये येथे सामुदायिकरित्या करण्यात आले असता मृतांच्या नातेवाईकांचे हुंदके अन् हंबरडे ऐकून अनेकांच्या काळजाचं पाणी झालं.

दरड दुर्घटनेतील मृतांचा आकडा ५३ वर पोहोचला आहे. या दुर्घटनेत केवळ ५ जण जखमी अवस्थेत सापडले आहेत. तर बेपत्ता असलेल्या ३१ जणांचा तीन दिवसांनंतरही शोध सुरुच होता. मात्र तीन दिवसांच्या शोध कार्यानंतर दरडीखाली कोणी जिवंत आढळून येईल, याची खात्री नसल्याने एकूण परिस्थिती पाहता लोकप्रतिनिधी, प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ, टीडीआरएफ पथकांचे मत आणि दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे नातेवाईक या सर्वांशी चर्चाविनिमय करुन आज हे बचावकार्य थांबविण्याचा निर्णय घेतला.

रविवारपर्यंत दरडीच्या ढिगाऱ्याखालून ५३ मृतदेह बाहेर काढण्यात आले होते, तर ५ जण जखमी अवस्थेत सापडले. या दुर्घटनेतील ३१ जणांना दि.२५ जुलै रोजी बेपत्ता घोषित करण्यात आले आहेत. या बेपत्ता व्यक्तींबाबत शासनास अहवाल सादर करण्यात येईल व त्यानुषंगाने शासनाचे आदेश प्राप्त करुन अशा बेपत्ता झालेल्या व्यक्तींपैकी ज्या व्यक्तींचा शोध लागू शकला नाही किंवा त्यांचे शवही सापडले नाही, अशा बेपत्ता व्यक्तींच्या वारसास शासन धोरणानुसार सानुग्रह मदत देण्यात यावी, अशी विनंती पालकमंत्री आदिती तटकरे यांनी शासनास केली.

यानंतर हिंदू संस्कृती तसेच सामाजिक चालीरीतीनुसार तळियेतील मृत व बेपत्ता अशा ८४ जणांचे उत्तरकार्य तळिये दरडग्रस्त भागापासून काही अंतरावर करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. यासाठी भव्य मांडव देखील उभारुन मृतांच्या तसबिरी एका रांगेत हारा-फुलांनी सजवून ठेवल्या गेल्या. जे सर्वजण २२ जुलैपर्यंत डोळ्यासमोर होते तेच सर्व आज तेराव्याला फोटोंमध्ये बघताना ग्रामस्थांना दुःख अनावर होत होते.

महिला वर्ग जुन्या आठवणीने आक्रोश करीत होता तर आबालवृद्धांनादेखील या आक्रोशामुळे डोळ्यांच्या पापण्यांना पाझर फुटला होता. कोणाचा अश्रूंचा बांध फुटला तर भल्याभल्यांच्या स्थितप्रज्ञतेचा कडेलोट होऊन हुंदके फुटू लागले.

आजही निर्वासितांसारखे जगणारे तळिये ग्रामस्थ या दरडीच्या



आठवणीनेही हंबरडा फोडताना उद्ध्वस्त झाल्याची जाणीव हमसाहमशी रडण्याच्या आवाजातून स्पष्ट होत होती. कोणाला लहान मुलं तर कोणाला मातापित्यांसारखे असलेले जीवलग आता त्यांच्यापासून दुरावल्याची जाणीव होऊ लागलेली दिसले. शोकाकूल आणि दुःखाला पारावार नसलेल्या तळियेवासींनी आज अश्रूंना मनमोकळेपणाने वाट करून दिली होती.

या दुर्घटनेतील ५३ मृत व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे- १) बाळू महादू यादव-७५, २) कृष्णाबाई बाळू यादव-७०, ३) गुणाची बाळू यादव-३०, ४) दिपाली गुणाजी यादव-३०, ५) अवनी सुनील शिरावले-५, ६) पार्थ सुनील शिरावले-१, ७) बाळकृष्ण तात्याबा कोंढाळकर-४५, ८) लक्ष्मण रावजी यादव-७०, ९) श्याम श्रीपत यादव-७५, १०) देवेंद्र श्याम यादव-३८, ११) दिपाली देवेंद्र यादव-३५, १२) अलका भीमसेन शिरावले-५०, १३) आयुष भीमसेन शिरावले-१२, १४) दिपाली भीमसेन शिरावले-१७, १५) देवकाबाई बापू सपकाळ-७२, १६) भरत तुळशीराम शिरा-वले-२५, १७) निकिता भरत शिरावले-२३, १८) केशव बाबुराव पांडे-७०, १९) रेशमा विजय पांडे-२८, २०) मनाली विजय पांडे-७, २१) उषा पांडुरंग कोंढाळकर-८०, २२) संजय बापू कोंढाळकर-५५, २३) अजित ज्ञानेश्वर कोंडाळकर-२२, २४) अभिजीत ज्ञानेश्वर कोंडाळकर-२०, २५) मंजुळा गणपत गायकवाड -७०, २६) प्रविण किसन मालुसरे-२५, २७) अनिता उर्फ मंदा संपत पोळ-५०, २८) ऋषिकेश चंद्रकांत कोंढाळकर-२५, २९) अश्विनी अमोल कोंढाळकर-२५, ३०) संकेत दत्ताराम जाधव-२५, ३१) सानिका संकेत जाधव-२२, ३२) द्रौपदी गणपत धुमाळ-७०, ३३) धोंडीराम लक्ष्मण शेडगे-६५, ३४) दैवत शंकर कोंडाळकर-६५, ३५) गणपत केदारी जाधव-८५, ३६) इशांत देवेंद्र यादव-१०, ३७) विघ्नेश विजय पांडे-५ महिने, ३८) करण देवेंद्र यादव-८, ३९) लिलाबाई यशवंत कोंढाळकर-६५, ४०) किसन काशीराम मालुसरे-५५, ४१) बाबू धोंडु सकपाळ-७५, ४२) संपत कुशाबा पोळ-५५, ४३) विमल तुळशीराम शिरा-वळे-६५, ४४) इंदीराबाई शांताराम शिरावळे-६२, ४५) अंजीराबाई बापू कोंढाळकर-६२, ४६) नर्मदाबाई तुकाराम कोंढाळकर-७५, ४७) सुगंधा ज्ञानेश्वर कोंढाळकर-३७, ४८) शकुंतला रामचंद्र कोंढाळकर-७०, ४९) सुधाकर रामचंद्र कोंढाळकर-४४, ५०) विजय बाळकृष्ण साळुंखे-२५, ५१) निराबाई शिवराम कोंढाळकर-६५, ५२) सुनंदा विठ्ठल जाधव-५०, ५३) भाविका नारायण निकम-१५

या दुर्घटनेत बेपत्ता असलेल्या व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे- १) प्रविणा सुनिल शिरावले-३०, २) आशा बाळकृष्ण कोंढाळकर-४०, ३) राहुल बाळकृष्ण कोंढाळकर-२३,४) पुष्पा लक्ष्मण यादव-६५, ५) तुळशीराम बाबू शिरावले-७०, ६) सुरज तुळशीराम शिरावले- २७, ७) हौसाबाई केशव पांडे-६५,८) शांताराम गंगाराम शिरावले-७५, ९) ज्ञानेश्वर तुकाराम कोंढाळकर-५५, १०) मधुकर तुकाराम कोंढाळकर-५४,११) तानुबाई रामचंद्र साळंखे- ७५, १२) यशवंत रामचंद्र कोंढाळकर-६५, १३) गणपत तानाजी गायकवाड-७५,१४) शिवराम सिताराम कोंढाळकर-७०, १५) शांताबाई काशीराम मालुसरे-७५, १६) कांता किसन मालुसरे-५०, १७) विद्या किसन मालुसरे-२२,१८) चंद्रकांत बापू कोंढाळकर-५०, १९) तन्वी चंद्रकांत कोंढाळकर -१२, २०) स्वरूपा चंद्रकांत कोंढाळकर- १०,२१) पांडुरंग तात्याबा कोंढाळकर-६०, २२) काजल पांडुरंग कोंढाळकर-२२, २३) सान्वी संकेत जाधव-१, २४) रामचंद्र बाळकृष्ण जाधव-७०,२५) सुशिला रामचंद्र जाधव-६५, २६) रमेश रामचंद्र जाधव-४०, २७) प्रदीप रामचंद्र जाधव-२९, २८) रविंद्र रामचंद्र जाधव-२६,२९) राधाबाई देवजी जाधव-८०, ३०) निराबाई हनुमंत कदम-५५, ३१) उर्मिला धोंडीराम शेडगे-६० अशी असून सर्वांचे आज उत्तर कार्य करण्यात आले.

## माणगांव येथे बसपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संदीप ताजने यांनी घेतली आढावा सभा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ३० जुलै रोजी श्रीवर्धन विधानसभा कमिटीची आढावा सभा झाली. चिपळूण येथील खेड तालुक्यातील पोसरी बौद्धवाडीतील पूरग्रस्त लोकांना पक्षाच्या वतीने आर्थिक मदत करून आल्यावर माणगांव येथील बहुजन समाज पार्टी कार्यालयात सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभा सुरु होण्यापूर्वी पोसरी बौद्धवडीत शास-नाची कोणत्याही प्रकारची मदत शासनाचे कोणीही अधिकारी व मंत्री पोहचले नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली. या सभेच्या वेळी श्रीवर्धन विधानसभा केडर संघटन बांधणीसाठी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी बसपाचे प्रदेश महासचिव प्रशांत इंगळे, राजेंद्र आहेर, जेष्ठ कार्यकर्ते कुंडलिक थोरे, रायगड जिल्हा प्रभारी सिद्धार्थ मोरे, श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष रामदास शिंदे, सुरेंद्र शेलार, सुमन सकपाळ, संजय गमरे, सुरेंद्र खैरे, प्रवीण जाधव, प्रवीण पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## उरणचे पत्रकार ही सरसावले पुरग्रस्तांच्या मदतीला



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

महाडमध्ये झालेल्या प्रलयंकारी महापुरामुळे संकटात सापडलेल्या जनतेला उरण तालुका दैनिक पत्रकार संघाने तेथे जाऊन मदतीचा हात दिला आहे. पुरग्रस्तांना संकट समयी केलेल्या या मदतीने त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

कोकणात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीचा फटका चिपळूण, खेड सह महाड तालुक्यात जबरदस्त बसला आहे. सावित्री, काळ या नद्यांनी महाड शहर व त्याच्या काठावर वसलेल्या अनेक वाड्या वस्त्यांची मोठी हानी केली आहे. पुराचे पाणी सुमारे बारा ते तेरा फुटांपर्यंत वाढल्याने अनेकांचे संसार मातीमोल झाले आहेत. नदी काठच्या वाड्या वस्त्या पुराच्या प्रवाहात वाहून गेल्याने अनेकांना आज उघड्यावर यावे लागले आहे.

या भयानक परिस्थितीचा सामना करताना प्रशासकीय यंत्रणा कोलमडली आहे.पूर ओ-सरला आणि पूरग्रस्तांचे सुरू झालेली परवड थांबविण्यासाठी अनेक मदतीचे हात पुढे आले आहेत.त्यात आपलाही एक मदतीचा हात असावा या हेतूने उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे समाजातील दानशूर व्यक्तींना पुरग्रस्तांसाठी मदत देण्याचे आवाहन केले. त्यास अनेकांनी प्रतिसाद दिला. त्यात पत्रकार संघाच्या सदस्यांनी आपला खारीचा वाटा उचलला. जमा झालेली ही मदत उरण तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महाड बिरवाडी, काळीज येथील लक्ष्मी आदिवासी वाडी, आसन पोई बौद्ध वाडी, आकले गाव तसेच भावे येथिल आदिवासी वस्तीत जाऊन पुरग्रस्तांच्या घराघरात मदतीचे वाटप केले.

सावित्री व काळ नदीने आपले पात्र सोडून प्रवाह बदलल्याने सामान्य जनतेची मोठी हानी केली आहे.त्यांचे झालेले नुकसान खूप मोठे असून त्यांच्या पर्यंत पोहचवलेली मदत अल्पप्रमाणात असल्याचे पुरग्रस्तांची स्थिती पाहिल्यावर कळून येते. अशी भावना पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर ठाकूर यांनी व्यक्त केली. ही मदत पुरग्रस्तांपर्यंत पोहचविण्यासाठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर ठाकूर, उपाध्यक्ष सूर्यकांत म्हात्रे, खजिनदार जीवन केणी, सेक्रेटरी राजकुमार भगत, सदस्य अनंत नारंगीकर, महेश भोईर, दत्तात्रेय म्हात्रे, सुभाष कडू, प्रदीप पाटील, जगदीश तांडेल यांनी सहभाग घेतला तर या मदतीचे वाटप उरणचे माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर व बिरवाडी ग्रामपंचायतचे माजी सदस्य विश्वास गुरव यांच्या हस्ते करण्यात आले.

### हरियाणातील बीएफआय राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मुलींचे घवघवीत यश

## जे.एम.म्हात्रे यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२५ जुलै ते ३१ जुलै यादरम्यान हरियाणा येथील सोनीपत येथे आयोजित केलेल्या चौथ्या मुलांच्या व मुलींच्या बीएफआय राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलमधील दोन मुलींनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून घवघवीत यश संपादन केले. या बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलच्या या दोन्हीही मुलींनी केलेल्या उत्तुंग कामगिरीबद्दल पनवेलचे आदर्श नगराध्यक्ष जे एम म्हात्रे यांनी आज (मंगळवार दि.३ ऑगस्ट) विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका सुरेखा मोहोकर, मनीषा परदेशी यांच्यासह आदी उपस्थित होते.



हरियाणा येथे झालेल्या राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशीप स्पर्धेत पनवेलच्या कु.योगिनी पाटील हीने ५२ किलो वजन गटात खेळून महाराष्ट्रासाठी रौप्य पदक जिंकले. या स्पर्धेत योगिताने प्राथमिक आणि उपांत्य फेरीत मध्य प्रदेश, बंगाल आणि दिल्लीच्या बॉक्सर्सचा पराभव केला. परंतु अंतिम सामन्यात योगिताला अवघ्या काही गुणांच्या फरकाने हरियाणाकडून पराभव पत्करावा लागला.

त्याचप्रमाणे कु.मधुरा पाटील हि खेळाडू ५४ किलो वजन गटामध्ये खेळली आणि क्वार्टर फायनलमध्ये हरयाणाकडून काही गुणाच्या फरकाने हरली.

परंतु कु.मधुराने तिच्या प्राथमिक फेरीत ओरिसा बॉक्सरचा पराभव केला होता. या दोन्हीही बॉक्सर्स खेलो इंडियासाठी पात्र झाल्या असून फेब्रुवारी २०२२ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या दोन्हीही बॉक्सर्स खेळाडूंच्या यशात त्यांच्या गुरूंचा मोठा हातभार आहे. या दोन्ही मुलींना एमपीएसए बॉक्सिंग क्लब मध्ये अद्वैत शेंबवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी ऑलिम्पियन अर्जुन पुरस्कार विजेते मनोज पिंगळे यांचे विशेष प्रशिक्षण मिळत आहे.

## गाडीचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाडे तत्वावर दिलेली गाडी ताब्यात घेऊन त्याचे भाडे न देता तसेच गाडीही परत न करता गाडीचा अपहार केल्याप्रकरणीची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

संकेत चिपटे यांची गाडी हरदेव सिंग यांना महिना १५ हजार या ठरलेल्या रकमेने भाडे तत्वावर दिलेली व त्याचा करार करण्यात आला होता. हरदेव सिंग यांनी सुरवातीला नियमितपणे भाडे दिले. परंतु त्यानंतर भाडे देण्यास टाळाटाळ करू लागला त्यामुळे संकेत चिपटे यांनी गाडी परत मागितली असता सदर गाडी परत न देता मोबाईलही परत देऊन तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्हा सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्रात अव्वल

## ३४ हजार ६५८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून संपूर्ण महाराष्ट्रात रायगड जिल्हा ठरला अव्वल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

न्यायालयात वर्षानुवर्षे वाद करीत बसून वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामंजस्याची भूमिका घेवून लोकन्यायालयात समेट घडवावा, असा प्रवाह भारतीय न्यायालयांच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रूढ झालेला आहे. नुकत्याच (दि.१ ऑगस्ट २०२१) रोजी अलिबाग येथे झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ३४ हजार ६५८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून संपूर्ण महाराष्ट्रात रायगड जिल्हा अव्वल ठरला आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा प्र.इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्या-तील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण ९२ हजार ३३२ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व ३३ हजार २२० व प्रलंबित प्रकरणांपैकी १ हजार ४३८ प्रकरणे अशी एकूण ३४ हजार ६५८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्याद्वारे पक्षकारांना एकूण १६ कोटी ९१ लाख २२ हजार ८३५ रूपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

मोटार अपघात प्रकरणातील ७३ प्रकरणे मिटवून २ कोटी ६९ लाख २७ हजार रुपयांची नुकसान भरपाई मयताच्या वारसांना मंजूर करण्यात आली. तसेच कौटुंबिक कलहाची ७१ प्रकरणे व पाणी पाट्टी वसूलीची १० हजार ४३३ वादपूर्व प्रकरणे लोक अदालतीमध्ये निकाली झालेली आहेत. रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत ४० लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, रायगड, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, विधिश व सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे व न्यायाधीश तथा सचिव श्री.संदीप स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

## ओबीसी महिला मोर्चा नवनियुक्त तालुकाध्यक्ष सुनीता कटेकर यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढील वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

### ओबीसी महिला मोर्चा रायगड जिल्हाध्यक्षा सिताताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या रायगड जिल्हाध्यक्षा, नगरसेविका सिताताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली भंगारपाडा येथील सुनिता कटेकर यांची ओबीसी महिला मोर्चा उरण मंडळ अध्यक्षा म्हणून नियुक्ती करण्यात आली. यानिमित्ताने आज (मंगळवार दि.३ ऑगस्ट) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन शुभाशीर्वाद घेण्यात आले. याप्रसंगी रामशेठ ठाकूर यांनी नवनियुक्त ओबीसी महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष सुनिता कटेकर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी महिला मोर्चा उल्लेखनीय कार्य करीत आहे. ओबीसी महिला मोर्चाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाचे ध्येय, धोरण व कार्यक्रमांची यशस्वीरीत्या अंमलबजावणी सुरू आहे.

त्याचप्रमाणे ओबीसी महिला मोर्चाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीची भूमिका व कार्य सर्वसामान्य नागरिकांपर्यंत निश्चितपणे पोहोचवले जाईल असा विश्वास ओबीसी महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा, नगरसेविका सिताताई पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.